अनंत चतुर्दशी
आमचे सर्व वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांना अनंत चतुर्दशीच्या हार्दिक शुभेच्छा !
गणेश विसर्जनाची सुट्टी असल्याने शनिवारचा अंक प्रकाशीत होणार नाही
दैनिक युवावार्ता

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३३ । किंमत - ४ रू
संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.)
शुक्रवार २५ /०९/२०२६ । पाने - ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

## युवावार्ता कार्यालयात गणरायाची भक्तिमय आरती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गणरायाच्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने गुरुवारी (दि. २४) दैनिक युवावार्ता कार्यालय परिसर दुमदुमून गेला. कार्यालयात विराजमान असलेल्या गणरायाची आरती तालुका काँग्रेस अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात आणि नगरसेविका डॉ. अनुराधा सातपुते यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. यावेळी युवावार्ता परिवारातील सदस्यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.

दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे आणि संपादक सौ. सुशीला किसन हासे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी युवावार्ताचे संचालक आनंद हासे, कार्यकारी संपादक सुदीप हासे यांच्यासह युवावार्ता परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना डॉ. जयश्री थोरात यांनी लोकशाही व्यवस्थेत प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. त्या म्हणाल्या, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि समाजासमोरील वास्तव मांडण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात. त्यामुळे लोकशाही बळकट करण्यामध्ये माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

संगमनेरसह देशातील बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना डॉ. थोरात यांनी विरोधी पक्षावर मोठी जबाबदारी असल्याचे नमूद केले. सर्वसामान्य नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून, आपल्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्यासाठी पुढे येणाऱ्या नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. संगमनेरचा विकास एका वर्षात झालेला नाही. बाळासाहेब थोरात आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक वर्षे संघर्ष करून संगमनेरच्या विकासाची पायाभरणी केली आहे. मात्र, गेल्या चाळीस वर्षांत काय केले, असा प्रश्न उपस्थित करून चुकीची माहिती दिली जाते, तेव्हा खंत वाटते, असेही डॉ. थोरात यांनी सांगितले. संगमनेरच्या भावी पिढीच्या हितासाठी संघर्ष सुरूच राहणार असल्याचे सांगताना त्यांनी देशपातळीवरील राजकीय परिस्थितीचाही संदर्भ दिला. काँग्रेस नेते राहुल गांधी हे केवळ 'डरो मत' असा संदेश देत नसून स्वतः बलाढ्य सत्तेविरोधात संघर्ष करत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या प्रामाणिक लढ्याला जनतेची साथ मिळत असल्याचेही डॉ. थोरात यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी दैनिक युवावार्ता परिवाराला गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा देत आगामी वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. गणरायाच्या आरती, जयघोष आणि भक्तिगीतांनी युवावार्ता कार्यालयातील वातावरण भक्तिमय व आनंदमय झाले.

## लोकप्रबोधनासाठी 'लोकसंवाद' उपक्रम

### शासकीय योजना व महिला-बालकांच्या सुरक्षेबाबत मार्गदर्शन



**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**संगमनेर –** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी लोकप्रबोधन आणि समाजजागृतीच्या व्यापक उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. याच लोकप्रबोधनाच्या परंपरेला पुढे नेत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीन गणेशोत्सवाच्या काळात विविध शासकीय योजना, शासनाची ध्येयधोरणे तसेच सामाजिक विषयांबाबत जनजागृती करण्यासाठी 'लोकसंवाद' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दैनिक युवावार्ता कार्यालयात 'लोकसंवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संगमनेरचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर उपस्थित होते. जिल्हा माहिती कार्यालयाच्या अंतर्गत माहिती अधिकारी मीना डास यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी माहिती अधिकारी मीना डास यांनी शासनाच्या विविध योजना, ध्येयधोरणे आणि नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती दिली. समाजात निर्भयता, शांतता आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. विशेषतः महिला, मुली आणि (पान ३ वर)

## शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदतीची ग्वाही

### कृषीमंत्री दत्ता भरणेंकडून संगमनेरात पीकपहाणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शेतकऱ्यांना उभे करण्यासाठी सर्व शासकीय विभागाच्या योजनांचा लाभ घेण्याबरोबरच पीक विमा आणि कर्जमुक्ती योजनांचा लाभ प्राधान्याने देण्यासाठी शासन शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे असल्याचे प्रतिपादन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

संगमनेर तालुक्यातील पिंपळे गावातील शेतकरी सोपान चकोर यांच्या शेताच्या बांधावर प्रत्यक्ष जात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दुष्काळसदृश परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या सोयाबीन पिकाची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत संगमनेरचे आमदार अमोल खताळ, राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, कृषी संचालक विनयकुमार आवटे, विभागीय कृषी सहसंचालक, बाबासाहेब जेजूरकर , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. सुधाकर बोराळे संगमनेरचे तहसीलदार धीरज मांजरे, तालुका कृषी अधिकारी श्रीमती बोडखे यांच्यासह महावितरण, ग्रामविकास आणि महसूल विभागाचे संबंधित अधिकारी आणि पिंपळे गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (पान २ वर)

## संगमनेर-कौठे कमळेश्वर महामार्गाला ९७ कोटींचा निधी

### औद्योगिक विकासासह आध्यात्मिक पर्यटनाला मिळणार चालना

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर संगमनेर-वडगाव-निळवंडे-कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० ड (जांभूळवाडी फाटा) या मार्गाच्या सुधारणा कामाला गती मिळाली आहे. सुमारे २० किलोमीटर लांबीच्या या रस्त्यासाठी ९७ कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, हा मार्ग अहिल्यानगर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासह आध्यात्मिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.



संगमनेर तालुक्यातील समनापूर येथे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी आमदार अमोल खताळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वरपे, उपअभियंता संजय टेकाळे यांच्यासह तालुका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

या रस्त्याची एकूण लांबी २० किलोमीटर असून, त्याच्या सुधारणा कामासाठी ९७ कोटी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मे २०२७ अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री विखे पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. अहिल्यानगर जिल्हा औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. संगमनेर-कौठे कमळेश्वर हा मार्ग समृद्धी महामार्ग तसेच शिर्डी विमानतळाशी जोडणीसाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे उद्योग, व्यापार आणि वाहतुकीला या मार्गाचा मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

(पान ६ वर)

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
गणेशोत्सव निमित्त सर्व गणेश भक्तांना हार्दिक शुभेच्छा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे




म.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
गणेशोत्सव निमित्त सर्व गणेश भक्तांना हार्दिक शुभेच्छा!
चांदीच्या दागिण्यांच्या मजुरीवर १००% सुट
सोने च्या दागिण्यांची मजुरीवर फक्त ७%
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
मो. ७५९९९९६९९९ /८२६५०३६८०७

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# जय मालपाणी यांची 'आयर्नमॅन'ची चौथी यशस्वी झेप

## संगमनेरच्या उद्योजकाची इटलीमध्ये उल्लेखनीय कामगिरी






युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरचे उद्योजक व मालपाणी समूहाचे संचालक जय मनिष मालपाणी यांनी इटलीतील Cervia येथे झालेल्या IRONMAN ७०.३ स्पर्धेत यशस्वीपणे अंतिम रेषा गाठत आपल्या सहनशक्ती, सातत्य आणि जिद्दीचा आणखी एक प्रत्यय दिला. २० सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धेत सहभागी खेळाडूंना १.९ किलोमीटर समुद्रात पोहणे, ९० किलोमीटर सायकलिंग आणि त्यानंतर २१.१ किलोमीटर धावणे अशी सलग आव्हानात्मक कामगिरी करावी लागते.

जय मालपाणी यांच्यासाठी ही स्पर्धा विशेष ठरली. तब्बल १०८.१ किलोमीटरचे अंतर तीन वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांत पूर्ण करत त्यांनी पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आपली उपस्थिती नोंदवली. त्यांच्या या प्रवासात इरीलशश्रेपर २०२३ येथील IRONMAN ७०.३ चा समावेश आहे. त्या स्पर्धेत त्यांनी ७ तास ४८ मिनिटे ४४ सेकंदांत शर्यत पूर्ण केली होती. त्यामध्ये पोहण्यास १:०३:४६, सायकलिंगस ३:२५:४६ आणि धावण्यास ३:०३:५० वेळ नोंदविला गेला.

यानंतर Valencia येथील IRONMAN ७०.३ स्पर्धेतही मालपाणी यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या स्वतःच्या अनुभववर्णनानुसार, या स्पर्धेसाठी व्यावसायिक जबाबदाऱ्या, प्रवास, प्रशिक्षण आणि दैनंदिन जीवन यांचा समतोल साधत त्यांनी तयारी केली. त्यांच्या मते, प्रत्येक दिवशी परिपूर्ण प्रशिक्षण होणे आवश्यक नसून सातत्याने प्रयत्न करत राहणे महत्त्वाचे आहे.

अडथळे आले, पण शर्यत थांबली नाही - इटलीतील स्पर्धेतील प्रवासही सहज नव्हता. पोहण्याच्या टप्प्यात जेलीफिशच्या दंशामुळे अडचणी निर्माण झाल्या. त्यानंतर ९० किलोमीटरच्या सायकलिंगदरम्यान सायकलचे टायर पंक्चर झाल्याने काही काळ त्यांना थांबावे लागले. दुरुस्ती करून त्यांनी पुन्हा सायकलिंग सुरू केले आणि शर्यत पूर्ण करण्याच्या निर्धाराने पुढील टप्पा गाठला. सायकलिंगनंतरचा २१.१ किलोमीटरचा रन हा शरीराची आणि मानसिक ताकदीची खरी कसोटी मानला जातो. वाढलेल्या तापमानामुळे शारीरिक ताण अधिक जाणवत असतानाही मालपाणी यांनी धावण्याचा टप्पा पूर्ण करत अंतिम रेषा गाठली.

व्यवसायाच्या धावपळीतून 'आयर्नमॅन'ची तयारी - जय मालपाणी हे व्यावसायिक क्षेत्रातही सक्रिय असून ते मालपाणी समूहाशी संबंधित विविध व्यवसायांची जबाबदारी सांभाळतात. खारसळलरर्ुश्रव चे व्यवस्थापकीय संचालक असलेले जय मालपाणी मनोरंजन व गुंतवणूकविषयक कामकाजात विशेष भूमिका बजावतात. त्यांच्या पूर्वीच्या अनुभवांमध्येही "Consistency over perfection' अर्थात परिपूर्णतेपेक्षा सातत्याला दिलेले महत्त्व अधोरेखित होते.

### पत्नी श्रेया यांची मोलाची साथ

**या संपूर्ण प्रवासात पत्नी श्रेया मालपाणी यांचेही महत्त्वपूर्ण योगदान राहिले. प्रशिक्षणाच्या काळात मानसिक आधार देण्याबरोबरच शर्यतीच्या दिवशीच्या तयारीत त्यांनी मदत केली आणि मार्गावरून जय यांचा उत्साह वाढवला. कुटुंबीय आणि प्रशिक्षकांच्या पाठिंब्याचाही त्यांनी आपल्या अनुभवांमध्ये उल्लेख केला आहे. Cervia येथे झालेल्या २०२६ च्या IRONM-N ७०.३ स्पर्धेला आंतरराष्ट्रीय स्वरूप होते. आयोजकांच्या माहितीनुसार या वर्षी Cervia येथे होणाऱ्या IRONMAN, IRONMAN ७०.३ आणि ५१५० या तीन स्पर्धांसाठी ६,५०० पेक्षा अधिक खेळाडू सहभागी झाले असून सुमारे ७० टक्के सहभागी परदेशातून आले होते.**

पान १ वरून

## शेतकऱ्यांना सर्वतोपरी...

पिंपळे गावातील काही शेतकऱ्यांच्या पीक विम्यात येत असलेल्या अडचणींची तातडीने दखल घेत, कृषी आणि महसूल विभागाने याबाबत तातडीने चालू खरीप हंगामात कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश कृषिमंत्री भरणे यांनी संबंधितांना दिले. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची स्वप्ने भंग पावली आहेत. अशा कठीण प्रसंगी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे कर्तव्य असून प्रशासनामार्फत शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शासकीय योजनांचा लाभ देण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. शेतकऱ्यांच्या हिताला आणि मदतीला सर्वोच्च प्राधान्य देऊन शेती, पशुपालन, चारा व पाणीटंचाई यावर तातडीने उपाययोजना करण्याचे सूचित करण्यात आले. केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाअंतर्गत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठीची परिपूर्ण अधिसूचना शासन स्तरावरून लवकरच निर्गमित केली जाणार आहे.

सोयाबीन पिकाची पाहणी करत असताना पावसाअभावी सोयाबीन पिकाचे पूर्ण नुकसान झाले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी शेतकरी बांधवांना धीर दिला. कृषिमंत्री भरणे म्हणाले की स्वतः मी शेतकरी असून शेतकऱ्यांच्या वेदना आणि परिस्थिती अनुभवली असल्याने आपण शेतकरी बांधवांच्या दुःखात सहभागी असून शासनामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व मदतीसाठी खंबीरपणे उभे असल्याचे ग्वाही दिली . शेतकऱ्यांना वीज पुरवठा वेळेत होत नसल्याने पाणीपुरवठा होण्यास अडचण होऊ नये यासाठी वीज महावितरण च्या संबंधित विभागाने डीपी आणि ट्रांसफार्मर योग्य वेळेत उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश महावितरण विभागास दिले. अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाच्या खंडामुळे पिकाचे नुकसान झाले असून मुगाची पेरणी ४७.८३% आणि उडदाची पेरणी ६१.४५% झाली आहे. तसेच कपाशीची ९१.६६% पेरणी झाली असून पिके पाती, फुलोरा व बोंडे धरण्याच्या अवस्थेत आहेत. पावसा अभावी वाढ खुंटली असून पाती व फुलांची गळ होत आहे. तसेच काही ठिकाणी रस शोषक कीड व गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सोयाबीनची ११३.०३% पेरणी झाली असून पीक सध्या शेंगा भरण्याच्या संवेदनशील अवस्थेत आहे.

## कृष्णा टेक्स्टाईलमध्ये धाडसी चोरी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-पुणे महामार्गावरील कृष्णा टेक्स्टाईल या दुकानात मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. २४ सप्टेंबर रोजी पहाटे अडीच ते तीन वाजण्याच्या दरम्यान स्विफ्ट डिझायर कारमधून आलेल्या चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश केला. दुकानाच्या काऊंटरमधील सुमारे १० हजार रुपये आणि गोशाळेच्या देणगी डब्यातील सुमारे १० हजार रुपये, अशी एकूण २० हजार रुपयांची रोकड लंपास करून चोरटे पसार झाले. या घटनेमुळे व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरटे स्विफ्ट डिझायर कारमधून कृष्णा टेक्स्टाईल परिसरात आले. त्यांनी थेट दुकानात प्रवेश न करता सुरुवातीला दुकानाच्या परिसरातील जनरेटरच्या मागे जवळपास अर्धा तास दबा धरला. परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवून योग्य संधीची वाट पाहिल्यानंतर चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडले आणि आत प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील काऊंटरमध्ये ठेवलेली रोख रक्कम तसेच गोशाळेसाठी ठेवण्यात आलेल्या देणगी डब्यातील रक्कम चोरून त्यांनी घटनास्थळावरून पोबारा केला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली व पंचनामा केला. दुकान परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये चोरट्यांच्या हालचाली कैद झाल्या असून, या फुटेजच्या आधारे पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. चोरट्यांनी वापरलेल्या स्विफ्ट डिझायर कारची ओळख पटविणे तसेच त्यांच्या हालचालींचा माग काढणे या दृष्टीने सीसीटीव्ही फुटेज महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान नाशिक-पुणे महामार्गावर पोलिसांकडून नियमित पेट्रोलिंग केले जात असतानाही चोरट्यांनी महामार्गालगतच्या दुकानाला लक्ष्य केल्याने सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या संपूर्ण प्रकारामुळे रात्रीच्या वेळी महामार्गालगतच्या व्यावसायिक आस्थापनांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त होत आहे. मोठ्या दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असल्याने अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी रात्रीची गस्त अधिक प्रभावी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# सिंहस्थासाठी १३६ ठिकाणी आरोग्य सुविधा

## १९० रुग्णवाहिका, ३,६०० अतिरिक्त वैद्यकीय कर्मचारी; १,९४५ खाटांची उपचार क्षमता



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - सिंहस्थ महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे लाखो भाविक दाखल होणार असल्याने त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व्यापक वैद्यकीय यंत्रणा उभारण्यात येत आहे. भाविकांना उपचारासाठी केवळ रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागू नये, यासाठी गर्दीच्या ठिकाणीच वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचे नियोजन नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने केले आहे. यासाठी महापालिका आरोग्य विभाग, जिल्हा रुग्णालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि प्रादेशिक संदर्भ रुग्णालय यांच्या २६० कोटी रुपयांच्या आरोग्य आराखड्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सिंहस्थाच्या काळात साधुग्राम, पार्किंग परिसर, घाट, होल्डिंग व स्टेजिंग एरिया, बाह्य पार्किंग तसेच प्रमुख मार्गांच्या परिसरात एकूण १३६ तात्पुरत्या आरोग्य सुविधा उभारण्यात येणार आहेत. यामध्ये तात्पुरती रुग्णालये, दवाखाने आणि आयसीयू सुविधांचा समावेश असेल. पोर्टा-कॅबिन स्वरूपात उभारण्यात येणाऱ्या या आरोग्य केंद्रांमुळे किरकोळ आजार, दुखापत किंवा प्राथमिक उपचारांची आवश्यकता असलेल्या भाविकांना मुख्य रुग्णालयात जाण्याची गरज कमी होणार आहे.

पर्वणीच्या काळात आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी १९० रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत. यामध्ये ॲडव्हान्स्ड लाइफ सपोर्ट आणि बेसिक लाइफ सपोर्ट रुग्णवाहिकांचा समावेश असेल. रुग्णालये, आरोग्य केंद्रे, घाट, साधुग्राम, पार्किंग परिसर आणि प्रमुख मार्गांवर या रुग्णवाहिका उपलब्ध राहणार आहेत.

वाढीव आरोग्य सुविधांसाठी ३,६०० अतिरिक्त वैद्यकीय व निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. यामध्ये विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर, परिचारिका, एएनएम, औषधनिर्माते, वैद्यकीय तंत्रज्ञ आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सिंहस्थापूर्वी या कर्मचाऱ्यांना मोठ्या गर्दीतील रुग्ण व्यवस्थापन आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. दरम्यान, सध्या उपलब्ध असलेल्या १,३०५ खाटांमध्ये आणखी ६४० खाटांची भर पडणार असून सिंहस्थाच्या काळात एकूण १,९४५ खाटांची उपचार क्षमता उपलब्ध होणार आहे. यामध्ये १८५ आयसीयू खाटांचा समावेश असेल. चार प्रमुख रुग्णालयांमध्ये ७३ अतिरिक्त आयसीयू खाटा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सिंहस्थाच्या काळात विविध भागांत नोंदविल्या जाणाऱ्या आजारांचे डिजिटल पद्धतीने निरीक्षण केले जाणार आहे. रुग्णवाहिकांच्या हालचालींसाठी जीपीएस ट्रॅकिंग, डिजिटल नोंदणी आणि आपत्कालीन संपर्क व्यवस्थेचाही आराखड्यात समावेश आहे. याशिवाय गरजेनुसार तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तीन पोर्टेबल आपत्कालीन वैद्यकीय युनिट्स तैनात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या विस्तारित आरोग्य व्यवस्थेमुळे सिंहस्थाच्या काळात लाखो भाविकांना त्यांच्या जवळच तातडीची वैद्यकीय सेवा मिळणार असून, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना कमीत कमी वेळेत पुढील उपचारासाठी हलविणे शक्य होणार आहे.

# एसआरआयच्या माध्यमातून ३ कोटी २८ लाख मतदारांची नावे वगळली- हर्षवर्धन सपकाळ



मुंबई (वृत्तसंस्था)

भारतीय जनता पक्ष निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदारांची नावे वगळून, त्यांना मतदानाच्या संवैधानिक अधिकारापासून वंचित ठेवत आहे. देशभरात सुरु असलेले हे षडयंत्र महाराष्ट्रातही आले असून एसआयआरच्या नावाखाली राज्यातील ३ कोटी २८ लाख मतदारांची नावे वगळली आहेत, हा सर्व प्रकार अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सुरु असून निवडणूक आयोग वगळलेल्या मतदारांची यादी जाहीर करत नाही, कोणतेही आकडे देत नाही. निवडणूक आयोगाच्या कामात पारदर्शकता नाही, सर्व कारभारच गौडबंगाल व संशयास्पद आहे. हे एक मोठे षडयंत्र असून मतदानाचा हक्क हिरावून घेत लोकशाहीचा गळा घोटण्याचा मोठा डाव आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस शिष्टमंडळाने राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची आज भेट घेतली. या शिष्टमंडळात विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य माजी मंत्री नसीम खान, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे उप नेते आ. अमिन पटेल, आमदार भाई जगताप, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश शर्मा, प्रदेश सरचिटणीस ड. संदेश कोंडविलकर, अभिजीत सपकाळ आदी उपस्थित होते.

निवडणूक अधिकाऱ्यांच्या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, राज्यात मतदारांची संख्या ९ कोटी ७८ लाख होती, यातून ३ कोटी २८ लाख मतदारांना वगळले तर ६.५ कोटीच मतदार राहतात. महाराष्ट्राची लोकसंख्या १२ कोटी आहे तर प्रौढ लोकसंख्या १० कोटीच्या वर असल्याचे सरकार आकडे सांगतात, हे आकडे पाहता १० कोटी मतदार असायला हवेत पण निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार ते ६.५ कोटीच आहेत. सरकारच्या वेगवेगळ्या विभागातील आकडे वेगवेगळे कसे. यातून निवडणूक आयोगाचा दुटप्पी कारभार व हलगर्जीपणा दिसत आहे. राज्यात गणेशोत्सवासह इतर सण व उत्सव असताना दावे व हरकती नोंदवण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरची वेळ निवडणूक आयोगाने दिली आहे, ही वेळ तीन महिने वाढवून दिली पाहिजे पण निवडणूक आयोगाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही.

ऍनामोली म्हणून ज्या १ कोटी २२ लाख मतदारांची नावे आहेत त्यांना निवडणूक आयोगाने नोटीसा बजावलेल्या नाहीत. सर्व संशयित मतदारांचा ३ कोटी २८ लाखांचा डेटा प्रकाशित करायला हवा, निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर, मतदारसंघ, बुथनिहाय ही यादी प्रसिद्ध करायला हवी पण तसे केलेले नाही. ही आकडेवारी निवडणूक आयोग का लपवून ठेवत आहे, काय गौडबंगाल आहे. एसआयआच्या माध्यमातून लाखो मतदारांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्याच्या देशभरातील कित्ता महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन उपमुख्यमंत्री गिरवत आहेत, हे महाराष्ट्रावरचे मोठे संकट आहे. भाजपा महायुतीचे सरकार व्होट चोरीतून सत्तेवर आलेले आहे हे काँग्रेस पक्षाने अनेक उदाहरणे व पुराव्यासह देऊन जाहीरपणे सांगितले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मतदारसंघ, नागपूर जिल्ह्यातील कामठी मतदार संघ यामध्ये कशा पद्धतीने व्होट चोरी करण्यात आली हे राहुल गांधी यांनी पुराव्यासह सांगितलेले आहे, त्यासंदर्भातील राहुल गांधी यांचा एक लेखही वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केला होता. महाराष्ट्रात ४० लाख मतदार कसे वाढले हे पुराव्यासह दाखवण्यात आले होते. आताही ७५ लाख मतदारांचा ठावठिकाणा लागत नाही हे निवडणूक आयोगानेचे मान्य केले आहे, याच ७५ लाख बोगस मतदारांच्या मतदीने भाजपा महायुतीचे सरकार राज्यता आले आहे, असेही सपकाळ म्हणाले.

# यमुना एक्सप्रेस वे वर धावती एसी बस पेटली, ९ प्रवासी जिवंत जळाले

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

एनसीआर ला लागून असलेल्या ग्रेटर नोएडाच्या यमुना एक्सप्रेसवेवर एक दुर्दैवी घटना घडली आहे. नोएडा येथून महोबाला चाललेल्या एका खासगी डबल डेकर स्लीपर एसी बसने अचानक पेट घेतला. या बसमध्ये ३५ प्रवासी होते. या भयानक दुर्घटनेत ९ प्रवाशांचा मृत्यू झाला. काही प्रवासी जिवंत जळाले तर काहींचा श्वास कोंडल्यामुळे मृत्यू झाला.



ग्रेटर नोएडा येथून बस आग्र्याच्या दिशेने जात असताना यमुना एक्सप्रेस वे वरील दयानतपुर गावाजवळ ही दुर्घटना घडली. ही प्रायवेट डबल डेकर बस दयानतपूर गावाजवळ पोहोचताच अचानक बसमधून धूर येऊ लागला. बसला आगीच्या ज्वाळांनी वेढलं. चालकाने प्रसंगावधान दाखवत लगेच बस एक्सप्रेस वे च्या कडेला उभी केली. लगेच संपूर्ण बसने पेट घेतला. पाहता-पाहता बस आगीचा गोळा बनली. आतमधल्या प्रवाशांना काही समजण्याआधीच संपूर्ण बसला आगीच्या ज्वाळांनी वेढलं. बसच्या आतून ओरडण्याचे, किंचाळण्याचे आवाज येत होते.या दुर्घटनेतून थोडक्यात बचावलेल्या प्रवाशाने त्याला आलेला भयानक अनुभव सांगितला. मी झोपलेलो, त्याचवेळी कोणीतरी दरवाजा ठोठावला. डोळे उघडले तेव्हा चारही बाजूला धूरच होता. आरडाओरडा, पळापळ सुरु होती. मी माझं सामान, बूट काही उचललं नाही. फक्त फोन हातात घेतला आणि बाहेरच्या बाजूला पळालो. बसमध्ये इतका धूर होता की, आतमध्ये काही दिसत नव्हतं. श्वास कोंडला गेल्यामुळे लोक आत तडफडत होते. मागे काही लोक अडकलेले ते बाहेर निघू शकले नाहीतदुर्घटनेची माहिती मिळताच यमुना एक्सप्रेस वे चे खासगी सुरक्षारक्षक, फायर ब्रिगेडच्या गाड्या आणि स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस आणि बचाव पथकाने अथक प्रयत्नाने आगीवर नियंत्रण मिळवलं. होरपळलेल्या प्रवाशांना लगेच नजीकच्या रुग्णालयात दाखल केलं.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# सहकारमहर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात महाविद्यालयात 'जल्लोष २०२६' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि सहकारमहर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार ३० सप्टेंबर २०२६ रोजी 'जल्लोष २०२६' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब वाघ यांनी दिली आहे.

विद्यार्थ्यांच्या कलात्मक व सर्जनशील क्षमतांना चालना मिळावी, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित व्हावी तसेच विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना एकत्र येऊन कला व संस्कृतीची देवाणघेवाण करता यावी या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना गायन, वादन, नृत्य, नाट्य, वक्तृत्व, चित्रकला, प्रश्नमंजुषा यासारख्या विविध २८ प्रकारचे कला अविष्कार सादरीकरण करण्याची संधी मिळणार असून या विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा या महोत्सवामध्ये गौरव करण्यात येणार आहे. युवक महोत्सवामध्ये सहभागी कलावंत विद्यार्थ्यांना विभागीय, राज्यस्तरीय तसेच आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असल्याने 'जल्लोष २०२६' हा महोत्सव विद्यार्थ्यांसाठी विशेष पर्वणी ठरणार आहे.

या युवा महोत्सवाचे उद्घाटन बुधवार दि.३० सप्टेंबर २०२६ रोजी लोकनेते मा.बाळासाहेब थोरात, माजी महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते, मा.आ. डॉ.सुधीर तांबे यांचे उपस्थित सकाळी ९.०० वा.होणार असून या प्रसंगी डॉ.सविता कुलकर्णी, संचालक, विद्यार्थी कल्याण अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, जिल्हा समन्वयक डॉ.प्रताप फलफले व विद्यापीठाचे इतर अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या युवा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.बाळासाहेब वाघ, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.जयराम डेरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.नानासाहेब गुंजाळ, आय.क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.लक्ष्मण घायवट, प्रशासन अधिकारी श्री.गोरक्षनाथ पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून आयोजनाची तयारी सुरू आहे. हा युवा महोत्सव विद्यार्थ्यांच्या कलागुणांना नवी दिशा देणारा आणि युवकांच्या उत्साहाला नवे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा असल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाच्यावतीने करण्यात येत आहे.

# प्रांत कार्यालयात धिंगाणा

## गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मोर्चादरम्यान मंगळवारी शेतकऱ्यांच्या (दि.२२) प्रांताधिकारी कार्यालयाच्या दालनात धुडगूस घातल्याप्रकरणी विक्रम खांडरे याच्याविरुद्ध संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत प्रांताधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार मार्तंड साळवे यांनी फिर्याद दिली आहे. संगमनेर तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून सातत्याने भारनियमन केले जात आहे. सध्या नदी वाहत असतांना देखील शेतकरी पिकांना पाणी देवू शकत नाही. पिके जळून चालल्याने शेतकरी संतप्त झाले असून शासनाचे लक्ष वेधत आपला रोष व्यक्त करण्यासाठी मंगळवारी मोर्चा काढला होता.

या मोर्चात माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्री थोरात, आर. एम. कातोरे. अजय फटांगरे सहभागी झाले होते. मोर्चादरम्यान प्रांताधिकारी अरुण उंडे निवेदन घेण्यासाठी येत नसल्याने संतप्त काही आंदोलक आक्रमक झाले. त्यांनी प्रवेशद्वार ओलांडत प्रांत अधिकारी कार्यालयाच्या आवारात गर्दी केली. यावेळी खांडरे याने प्रांताधिकारी कार्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार ओलांडून दालनात बळजबरीने प्रवेश केला. पोलिस फिर्यादीनुसार, त्याने दालनातील खुर्ची व कागदपत्रांची फेकाफेक केली. तसेच शासकीय कार्यालयातील महत्त्वाचे साहित्य व कागदपत्रांचे नुकसान केले. सरकारी कामात अडथळा आणणे, शासकीय कार्यालयाची नासधूस करणे आणि शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याने संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक खान करत आहेत.

# भाजप अल्पसंख्यांक मोर्चाची उत्तर अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी जाहीर



युवावार्ता (प्रतिनीधी)

संगमनेर : भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्यांक मोर्चाच्या उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याची नूतन जिल्हा कार्यकारिणी लोणी येथील जनसेवा कार्यालयात पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते नुकतीच जाहीर करण्यात आली. जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांनी नूतन कार्यकारिणीची घोषणा केली. अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे पाटील, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश प्रभारी राजेश पांडे, प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, प्रदेश उपाध्यक्ष सलीम बागवान, महामंत्री एजाज शेख तसेच भाजपा उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे. नूतन कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस, कोषाध्यक्ष, सोशल मीडिया प्रमुख, जिल्हा सचिव तसेच कार्यकारिणी सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची कायम निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

अल्पसंख्यांक समाजातील विविध घटकांपर्यंत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती पोहोचविणे, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, युवकांना संघटनेशी जोडणे तसेच समाजातील विविध प्रश्नांवर सकारात्मक पद्धतीने काम करण्यास नूतन कार्यकारिणी प्राधान्य देणार आहे. त्याचबरोबर भारतीय जनता पक्षाची विकासाची भूमिका समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवून पक्षाचे संघटन अधिक व्यापक व मजबूत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या विचारधारेनुसार समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन कार्य करण्याचा निर्धार नूतन पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून आगामी काळातील संघटनात्मक व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. अल्पसंख्यांक समाजाच्या विविध प्रश्नांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पान १ वरून

# लोकप्रबोधनासाठी ...

बालकांच्या सुरक्षिततेसाठी कोणती काळजी घ्यावी, संकटाच्या प्रसंगी कोणत्या यंत्रणेशी संपर्क साधावा, तसेच त्यांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेली कायदेशीर व्यवस्था याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी 'लोकसंवाद' या शासकीय उपक्रमाचे कौतुक केले. पोलीस दलाच्या माध्यमातून महिला आणि बालकांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना व उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी कोणती भूमिका बजावावी, तसेच दैनंदिन जीवनात अचानक उद्भवणाऱ्या प्रसंगांना सामोरे जाताना कोणती दक्षता घ्यावी, याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल रात्रंदिवस कार्यरत असते. मात्र, पोलिसांच्या कार्याला नागरिकांचे सहकार्य, विश्वास आणि प्रेम मिळाल्यास समाजासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याची ऊर्जा मिळते, असे पोलीस निरीक्षक बारवकर यांनी सांगितले. यावेळी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सामाजिक परिवर्तन आणि लोकप्रबोधनाच्या उद्देशाने दैनिक युवावार्ता सातत्याने विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होत असल्याचे त्यांनी सांगितले. वृत्तपत्र हे केवळ बातम्या देण्याचे माध्यम नसून समाजाला दिशा देणारे आणि नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणारे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी नमूद केले.दैनिक युवावार्ताच्या संपादक सुशीला किसन हसे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शासनाच्या योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'लोकसंवाद'सारखे उपक्रम महत्त्वपूर्ण असून, अशा उपक्रमांना दैनिक युवावार्ता परिवाराचे सदैव सहकार्य राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्या अंतर्गत शिर्डी कार्यालयाच्या वतीने मिळालेल्या सहकार्याबद्दल माहिती अधिकारी मीना डास यांनी दैनिक युवावार्ता परिवाराचे आभार मानले. शासकीय योजना आणि नागरिकांमध्ये संवादाचा सेतू निर्माण करणारा तसेच महिला, बालक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत जागृती निर्माण करणारा हा 'लोकसंवाद' कार्यक्रम उपयुक्त ठरला.

# पार्वताबाई कासार यांचे वृद्धापकाळाने निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

निमज (ता. संगमनेर) येथील गं. भा.पार्वताबाई विठ्ठल कासार (वय ९२) यांचे बुधवारी (दि. २३ सप्टेंबर) रात्री ८.३० वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने कासार परिवारासह नातेवाईक व आप्तेष्टांमध्ये शोककळा पसरली.



त्यांच्यावर गुरुवारी (दि. २४ सप्टेंबर) सकाळी निमज (अमरधाम), ता. संगमनेर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पार्वताबाई कासार यांच्या पश्चात माजी उपनगराध्यक्ष विवेक विठ्ठल कासार, दिलीप विठ्ठल कासार (मुले), वत्सला लक्ष्मण बिबवे, शोभा तात्याराम कढणे, पुष्पा सहदेव चौधरी (मुली), अमित दिलीप कासार, अजित दिलीप कासार व नगरसेवक सौरभ विवेक कासार (नातवंडे) असा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल समस्त कासार परिवार व आप्तेष्टांनी शोक व्यक्त केला.

# राजूर येथे अपर तहसीलदार कार्यालय

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - राज्यपाल यांच्या आदेशानुसार सरकारच्या कार्यासन अधिकारी राणी देवकते यांनी अकोले तालुक्यातील राजूर व नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे अपर तहसीलदार कार्यालय तातडीने करण्यास मंजुरी दिली आहे. अकोले तालुक्यातील राजूर येथीही अपर तहसीलदार कार्यालय मंजूर झाले आहे.

अकोले तालुक्यातील राजूर येथे अपर तहसीलदार कार्यालय मंजूर करताना शासनाने त्या-त्या तालुक्यातील मंडलाची विभागणी करून तात्पुरते कार्यालय तातडीने सुरू करण्याचे आदेशात नमूद केले आहे. शासन निर्णय जाहीर होताच राजूर ग्रामस्थांनी आनंद साजरा केला. कार्यालयीन कामकाजाचा वाढता व्याप व उपलब्ध अपुरी अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या, तसेच भौगोलिक स्थान आणि वाढती लोकसंख्या विचारात घेऊन प्रशासनाचे कामकाज लोकाभिमुख होण्यासाठी जिल्ह्यातील दोन गावांत अपर तहसीलदार कार्यालय मंजूर करण्यात आले. कार्यालय मंजूर करताना पदांनाही शासनाने मंजुरी दिली आहे. अपर कार्यालय कार्यान्वित झाल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ कायद्यान्वये नेमून दिलेल्या क्षेत्रासाठी असेल. निवडणूक, संजय गांधी निराधार योजना करता आलेले अर्ज, निवेदन मुख्य तहसील कार्यालयास सादर करायचे आहेत. राजूर अपर तहसील कार्यालयाचे प्रतिवेदन अधिकारी म्हणून संबंधित उपविभागीय अधिकारी व त्यास नियंत्रक म्हणून जिल्हाधिकारी काम पाहतील, असे शासन आदेशात नमूद केले आहे. राजूर येथे तातडीने तात्पुरते कार्यालय सुरू करून नवीन कार्यालय बांधकामाचा प्रस्ताव सादर करण्याचे सूचित केले आहे. ह शासन निर्णय मंगळवारी प्रसिद्ध झाला आहे. राजूर अपर तहसील कार्यालयासंदर्भात राज्यपालांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव, उपमुख्य मंत्री नगरविकास विभाग सचिव व अन्य २२ शासकीय विभागांना आदेशाची प्रत देऊन सूचित करण्यात आले आहे.

# शून्यातून अनंताकडे... गणेश विसर्जनाचा आध्यात्मिक अर्थ

'सान्ताला अनंतात विलीन करणे' म्हणजे अनंत चतुर्दशी. जे सान्त आहे, त्याला अनंतात; जे साकार आहे, त्याला निराकारात आणि जे सगुण आहे, त्याला निर्गुणात विलीन करणे, असा अनंत चतुर्दशीचा आध्यात्मिक अर्थ आहे. साकार भगवंत मूर्तीत असतो; मात्र निराकार तत्त्व सर्वत्र व्यापून असते. ध्येयमूर्ती, मंगलमूर्ती, ज्ञानमूर्ती असलेल्या श्री गणेशाचे आपण अनंत चतुर्दशीच्या दिवशी विसर्जन करतो.

गणेशोत्सवाचे हे दहा दिवस केवळ उत्सव, सजावट आणि नृत्य-गाण्यापुरते मर्यादित नसावेत. या काळात श्री गणेशाकडून आपण काही जीवनमूल्ये आत्मसात केली पाहिजेत. गणेशासमोर नाचणे, आरती करणे आणि पूजा करणे याबरोबरच 'गणेशतत्त्व काय आहे?', 'गणपती दहा दिवस का विराजमान होतो?' आणि 'अनंत चतुर्दशीला त्याचे विसर्जन का केले जाते?' याचा विचार होणेही तितकेच आवश्यक आहे.

आपण श्री गणेशाला 'मंगलमूर्ती' म्हणतो. त्यामागील भावना अशी की, आपल्या जीवनातील अमंगल दूर जावे आणि मंगल विचार, सद्गुण व सकारात्मकता वाढावी. गणपती हा 'गुणपती' आहे, तसेच 'विज्ञानपती'ही आहे. त्यामुळे केवळ गणपतीची पूजा करण्यापेक्षा त्याचे गुण आपल्या आचरणात कसे उतरतील, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

गणपतीचे गजमुख आपल्याला अनेक जीवनमूल्ये शिकवते. हत्तीचे कान सुपासारखे असतात. सुपाचा गुणधर्म म्हणजे चांगले ते आत ठेवणे आणि अनावश्यक, वाईट ते बाहेर टाकणे. त्याप्रमाणे आपणही चांगले ऐकावे, शुभ विचारांचे श्रवण करावे आणि वाईट गोष्टींपासून दूर राहावे.



गणपतीचे बारीक डोळे सूक्ष्मदृष्टीचे प्रतीक आहेत. तर हत्तीची सोंड आपल्याला दूरदृष्टीचा संदेश देते. जीवनात कोणताही निर्णय घेताना सूक्ष्मदृष्टी आणि दूरदृष्टी या दोन्हींचा विचार असणे आवश्यक आहे.

गणपतीला एक पूर्ण आणि एक अर्धा दात असल्याचे चित्रण केले जाते. पूर्ण दात हा श्रद्धेचे, तर अर्धा दात हा बुद्धीचे प्रतीक मानला जातो. श्रद्धा पूर्ण असावी; मात्र ती अंधश्रद्धा नसावी. बुद्धीचा वापर करून, समजून-उमजून श्रद्धा ठेवणे आवश्यक आहे.

गणपतीला दुर्वा प्रिय आहेत. ज्या साध्या गवताला माणूस अनेकदा किंमत देत नाही, त्यालाच श्री गणेशाच्या पूजेत महत्त्वाचे स्थान आहे. यातून एक मोठा संदेश मिळतो-कोणालाही कमी लेखू नका. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही गुण असतात.

गणपतीला लाल जास्वंदीचे फूल प्रिय मानले जाते. लाल रंग हा परिवर्तनाचा, क्रांतीचा प्रतीक मानला जातो. त्यामुळे या दहा दिवसांच्या उत्सवानंतर आपल्या जीवनात नेमका कोणता बदल झाला, याचे आत्मपरीक्षण अनंत चतुर्दशीच्या दिवशी करणे आवश्यक आहे.

गणपतीला 'लंबोदर' असेही म्हटले जाते. सर्वांचे अपराध पोटात घेण्याचा, क्षमाशीलतेचा हा संदेश आहे. मात्र एखादी चूक वारंवार होत राहिली तर त्यावर अंकुश ठेवणेही आवश्यक आहे. क्षमा आणि शिस्त यांचा समतोल जीवनात असला पाहिजे.

### विसर्जनामागील पौराणिक संदर्भ

अनंत चतुर्दशीला गणपतीच्या विसर्जनामागे एक पौराणिक कथा सांगितली जाते. महर्षी वेदव्यास यांनी महाभारताचे लेखन करण्यासाठी गणपतीला विनंती केली. गणपतीने अखंडपणे दहा दिवस महाभारताचे लेखन केले. सतत लेखन केल्यामुळे त्यांच्या शरीरातील उष्णता वाढली. शरीराला थंडावा मिळावा म्हणून वेदव्यासांनी दहाव्या दिवशी, म्हणजेच अनंत चतुर्दशीला, गणपतीला पाण्यात डुबकी मारण्यास सांगितले. तेव्हापासून गणेश विसर्जनाची परंपरा सुरू झाली, अशी मान्यता आहे.

या कथेला आध्यात्मिक अर्थही आहे. गणेश चतुर्थीला मातीपासून मूर्ती घडवून तिची प्रतिष्ठापना केली जाते आणि अनंत चतुर्दशीला ती पुन्हा पाण्यात विसर्जित केली जाते. म्हणजेच मातीपासून निर्माण झालेले रूप पुन्हा निसर्गातच विलीन होते. हा निसर्गचक्राचा मूलभूत नियम आहे-निर्मिती, स्थिती आणि विलय.

'अनंत' म्हणजे ज्याला अंत नाही. भगवान विष्णूंनाही 'अनंत' असे संबोधले जाते. गणेशतत्त्व हेही अशाच अनंत ज्ञानाचे प्रतीक आहे. मूर्तीचे विसर्जन होते; मात्र तिच्यामागील विचार, ज्ञान आणि संस्कार यांचे विसर्जन होऊ नये. उलट ते आपल्या आचरणातून पुढे जावे. म्हणूनच गणेशोत्सवाचा खरा अर्थ केवळ उत्सव साजरा करण्यात नाही, तर गणेशतत्त्व ओळखण्यात, त्याचे ज्ञान आत्मसात करण्यात आणि ते जीवनात उतरवण्यात आहे. अनंत चतुर्दशी आपल्याला एक सुंदर संदेश देते-रूपाचा अंत होतो, पण तत्त्वाचा नाही. मूर्ती निसर्गात विलीन होते; मात्र तिच्याकडून मिळालेले ज्ञान आपल्या विचारांत आणि कृतीत जिवंत राहिले पाहिजे.

आपला प्रवास हा शून्यातून अनंताकडे जाणारा आहे. गणेश विसर्जन म्हणजे या प्रवासाचीच एक सुंदर आध्यात्मिक आठवण आहे.

**– प्रा. शशांक गंधे**
संगमनेर, मोबा. ९८९०१६३७४२

## संपादकीय...

# गणेश विसर्जन करताना सावधगिरी बाळगा...

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये गणरायाचे आगमन झाले की वातावरण भक्तिमय होते. आरती, भजन, ढोल-ताशे, सजावट आणि विविध सामाजिक उपक्रमांनी संपूर्ण परिसर उत्साहाने भरून जातो. मात्र, या आनंदोत्सवाची सांगता करताना सर्वांनी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. गणेश विसर्जन हा केवळ धार्मिक विधी नसून सामूहिक जबाबदारीचा क्षण आहे. त्यामुळे 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' म्हणताना सुरक्षिततेचा मंत्रही प्रत्येकाच्या मनात असला पाहिजे. विसर्जनाच्या दिवशी सर्वाधिक गर्दी नदी, तलाव, धरणे, विहिरी आणि कृत्रिम विसर्जन कुंडांच्या परिसरात होते. भक्तिभावाच्या वातावरणात अनेकदा उत्साहाचा अतिरेक होतो आणि सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष केले जाते. विशेषतः लहान मुले, युवक आणि पोहता न येणारे नागरिक पाण्यात उतरण्याचा प्रयत्न करतात. पाण्याची खोली, प्रवाह, शेवाळ किंवा तळाचा अंदाज नसल्याने दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे पाण्यात उतरून मूर्ती विसर्जित करण्याऐवजी प्रशासनाने निश्चित केलेल्या विसर्जनस्थळीच मूर्ती द्यावी, हा सर्वांसाठी सुरक्षित पर्याय आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी नदी किंवा तलावाच्या काठावर सेल्फी काढणे, फोटो किंवा व्हिडिओ करण्यासाठी धोकादायक ठिकाणी जाणे, पाण्यात उड्या मारणे किंवा एकमेकांना पाण्यात ढकलणे, हे प्रकार पूर्णपणे टाळले पाहिजेत. काही क्षणांच्या मजेसाठी स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालणे शहाणपणाचे नाही. सोशल मीडियावर फोटो किंवा व्हिडिओ पोस्ट करण्यापेक्षा आपल्या कुटुंबीयांसह सुरक्षितपणे घरी परतणे अधिक महत्त्वाचे आहे. लहान मुलांची जबाबदारी पालकांनी घ्यावी. विसर्जनाच्या मिरवणुकीत मुलांना सोबत नेताना त्यांच्यावर सतत लक्ष ठेवणे गरजेचे आहे. गर्दीत मुले हरवण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांच्या खिशात पालकांचा संपर्क क्रमांक ठेवणे, मुलांना एकटे न सोडणे आणि पाण्याच्या ठिकाणी त्यांना अजिबात पुढे जाऊ न देणे आवश्यक आहे. उत्सवाच्या उत्साहात पालकांचे लक्ष काही क्षणांसाठी विचलित झाले तरी मोठी दुर्घटना घडू शकते. यासोबतच मिरवणुकीतील वाहतूक सुरक्षेलाही प्राधान्य दिले पाहिजे. विसर्जनाच्या दिवशी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात गर्दी असते. ट्रॅक्टर, ट्रक, टेम्पो, ढोलपथके आणि इतर वाहनांसोबत नागरिकांची मोठी उपस्थिती असते. वाहनांवर क्षमतेपेक्षा अधिक लोकांना बसवणे, वाहनाच्या कडेला किंवा छतावर उभे राहणे, धोकादायक पद्धतीने नाचणे यामुळे अपघात होऊ शकतात. चालकांनी मद्यपान करून वाहन चालवू नये आणि वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळावा. मिरवणुकीत सहभागी प्रत्येकाने वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. ध्वनीप्रदूषण आणि पर्यावरणाचा प्रश्नही विसरता कामा नये. गणेशोत्सव हा आनंदाचा सण असला तरी इतर नागरिकांच्या आरोग्याचा आणि शांततेचा विचार करणे हीदेखील आपली सामाजिक जबाबदारी आहे. मोठ्या आवाजातील ध्वनिक्षेपक, डीजे किंवा फटाक्यांचा अतिरेक टाळला पाहिजे. विशेषतः रुग्णालये, वृद्ध नागरिक, लहान मुले आणि विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. गणेश विसर्जनाचा पर्यावरणाशीही जवळचा संबंध आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, निर्माल्य आणि प्लास्टिकमुळे जलस्त्रोतांचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे शक्यतो शाडू मातीच्या आणि पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर करावा. निर्माल्य नदी-तलावात टाकण्याऐवजी प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या निर्माल्य कलशात द्यावे. प्लास्टिकच्या पिशव्या, थर्माकोल, फुलमाळा आणि इतर कचरा पाण्यात टाकू नये. प्रशासन, पोलीस, नगरपालिका आणि स्वयंसेवी संस्थांची विसर्जनाच्या दिवशी मोठी जबाबदारी असते. आवश्यक त्या ठिकाणी बॅरिकेडिंग, प्रकाशयोजना, सीसीटीव्ही, जीवरक्षक, रुग्णवाहिका आणि अग्निशमन यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे. गर्दीचे नियोजन आणि वाहतूक नियंत्रण प्रभावीपणे केले पाहिजे. मात्र, प्रशासनाने कितीही व्यवस्था केली तरी नागरिकांनी स्वतःची जबाबदारी स्वीकारल्याशिवाय उत्सव पूर्णपणे सुरक्षित होऊ शकत नाही. गणेशोत्सव आपल्याला श्रद्धा, एकता आणि सामाजिक बांधिलकी शिकवतो. त्यामुळे विसर्जनाच्या दिवशीही हीच भावना जपली पाहिजे. एखादा अपघात घडल्यानंतर मदतीसाठी धावण्यापेक्षा अपघात होऊ नये यासाठी आधीच काळजी घेणे अधिक महत्त्वाचे आहे. एखाद्याला पाण्यात अडचणीत पाहिल्यास स्वतः पोहता येत नसेल तर पाण्यात उडी मारण्याऐवजी तातडीने जीवरक्षक, पोलीस किंवा आपत्कालीन यंत्रणेला माहिती द्यावी.

# अमृतवाहिनी एमबीएच्या ७ विद्यार्थ्यांची वार्षिक ६.१२ लाख पॅकेजवर निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात गुणवतापूर्ण शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, संगमनेर येथील एमबीएच्या ७ विद्यार्थ्यांची हाउसी कीमॅन्शन्स प्रायव्हेट लिमिटेड या नामांकित कंपनीमध्ये रिलेशनशिप मॅनेजर या पदासाठी निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक ६.१२ लाख रुपयांचे वेतन पॅकेज मिळाले आहे. अशी माहिती अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एम. लोंढे यांनी दिली.



या निवड प्रक्रियेत सोनल गायकवाड, ओंकार घोडके, अमोल नागरे, ओम अनेराव, आरती शिंदे, ऐश्वर्या सालबंदे आणि आकांक्षा बोरुडे या ७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यांचा विकास, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत तंत्र तसेच करिअर मार्गदर्शन यावर सातत्याने भर दिला जातो. विद्यार्थ्यांना बदलत्या औद्योगिक क्षेत्राच्या गरजा समजून घेता याव्यात आणि त्यांच्यामध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित व्हावीत, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. या एमबीए महाविद्यालयाची स्थापना दूरदृष्टी नेतृत्व असलेले सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेमधून १९९४-१९९५ मध्ये झाली त्यानंतर माजी नामदार बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने आतापर्यंत दैदीप्यमान यश संपादन केलेले आहे. त्यामध्ये महाविद्यालयात दरवर्षी उत्कृष्ट निकालाची परंपरा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची प्लेसमेंट, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेमिनार कॉन्फरन्सेस चे आयोजन, आणि नवीन उद्योजक घडविण्याचे कार्य केले आहे. अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालय हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायम संलग्नित असून महाविद्यालयाने सर्वच क्षेत्रात उच्च निकालाची परंपरा राखलेली आहे तसेच महाविद्यालयाने आय. एस. ओ. मानांकन प्राप्त केलेले असून इ.स. सन २०२४ मध्ये महाविद्यालयाने युजीसी चे छ-- उ चे ए ग्रेड मानांकन मिळवलेले आहे. महाविद्यालयास पुणे विद्यापीठ अंतर्गत व्यवस्थापन शास्त्रातील संशोधन केंद्रास मान्यता मिळालेली आहे. अशा या ग्रामीण भागातील महाविद्यालयात अनुभवी व उच्चविद्याविभूषित प्राध्यापक वर्ग कार्यरत आहे. त्यापैकी दहा प्राध्यापकांनी सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी मधून पीएचडी पदवी संपादन केलेली असुन संशोधन केंद्रात पीएचडी चे मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रात ३५ संशोधक विद्यार्थी पीएचडीचे शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागामार्फत विविध नामांकित कंपन्यांशी समन्वय साधून कॅम्पस इंटरव्यू, प्री-प्लेसमेंट ट्रेनिंग, मॉक इंटरव्यू, ग्रुप डिस्कशन आणि कौशल्यविकास उपक्रम राबविले जातात. या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना विविध उद्योगक्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. एकाच कंपनीमध्ये एमबीएच्या सात विद्यार्थ्यांची झालेली निवड ही अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयाच्या उद्योगाभिमुख शिक्षणपद्धती आणि प्रभावी प्लेसमेंट प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण कामगिरी मानली जात आहे.

# माळी घोगरगाव येथील मोर्चातील बदनामीकारक वक्तव्याचा निषेध



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वैजापूर तालुक्यातील माळी घोगरगाव येथे धर्मांतराच्या आरोपावरून काढण्यात आलेल्या हिंदू जनआक्रोश मोर्चादरम्यान ख्रिस्ती धर्म, धर्मगुरू, शैक्षणिक संस्था तसेच प्रभू येशू, पवित्र मरिया आणि संत मदर तेरेसा यांच्याविषयी करण्यात आलेल्या आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्यांचा सकल ख्रिस्ती समाज व विविध परिवर्तनवादी संघटनांच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. संबंधित वक्त्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन श्रीरामपूर येथील अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस निरीक्षक चारुदत्त खोंडे यांना देण्यात आले.

माळी घोगरगाव (ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे धर्मांतराचा आरोप करीत ख्रिस्ती धर्मगुरू व शैक्षणिक संस्थेविरोधात हिंदू जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चातील काही वक्त्यांनी ख्रिस्ती धर्मगुरू, संस्था तसेच ख्रिस्ती धर्मातील श्रद्धास्थानांविषयी आक्षेपार्ह वक्तव्ये केल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. या वक्तव्यांमुळे ख्रिस्ती समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, संबंधित शैक्षणिक संस्थेच्या चालकाला लक्ष्य करण्यासाठी धर्मपरिवर्तनाचा खोटा आरोप करून मूळ प्रश्नाला बगल देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही निवेदनाद्वारे करण्यात आला. कोणत्याही धर्माविषयी अथवा धार्मिक व्यक्ती व संस्थांविषयी अपमानास्पद वक्तव्ये करून समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. राज्यात तसेच देशात अल्पसंख्याक समाजावरील अन्याय-अत्याचाराच्या घटना वाढत असल्याबद्दलही यावेळी चिंता व्यक्त करण्यात आली.

यावेळी ऑल इंडिया ख्रिश्चन फोरमचे उपसंचालक अनिल भोसले, प्रवीणराजे शिंदे, पी. एस. निकम, दीपक कदम, राजेंद्र भोसले, पास्टर अण्णा अमोलिक, सुरेश ठुबे, निशिकांत पंडित, सतीश पाटोळे, बाळासाहेब भोसले, पॉल बनकर, सुनील वाघमारे, इझाती रूपटक्के, सुरेश अमोलिक, पास्टर राजेश कर्डक, रविंद्र गायकवाड, विजय बोर्डे, अण्णासाहेब अमोलिक आदींसह मोठ्या संख्येने ख्रिस्ती समाजबांधव उपस्थित होते.


युवावार्ता
जाहीरात छोटी, प्रतिसाद मोठा

**Jijamata English Medium School**
Pavbaki Road Sangamner, CBSE Affiliation No - 1131530

**VACANCIES**

| PARTICULARS | POST | QUALIFICATIONS |
|---|---|---|
| Pre Primary Teachers | 2 | H. Sc., D. T. Ed |
| PRIMARY AND SECONDARY | | |
| English, Marathi, Hindi | 1 | H. Sc., D. T. Ed / B.A. / M.A., B.Ed |
| Maths, EVS, Science | 1 | B.Sc./M.Sc. (Maths / Science) B.Ed. |
| Social Studies | 1 | B.A. / M.A., B.Ed (History & Geography) |
| IT Teacher | 1 | B.C.S. / M.C.S, B.C.A. / M.C.A. |
| Physical Director | 1 | B.A., B.P. Ed |
| Special Educator | 1 | B.A. / M.A., B.Ed. in Special Education or equivalent qualification |
| School Counsellor | 1 | B.A. / M.A. Clinical Psychology / Diploma/certificate in School Couselling |
| Dance Teacher | 1 | Diploma/ Degree in Fine Arts Performing Art or Related Field |
| Music Teacher | 1 | Sangeet Visharad Proficiency in singing & teaching musical instruments |
| Art and Craft Teacher | 1 | A.T.D.C.T.C (Minimum 2 years teaching experience of CBSE / State Board) |

EXCELLENT ENGLISH COMMUNICATION, COMPUTER, AI SKILLS ARE MANDATORY
UNIVERSITY STUDENTS ARE HIGHLY ENCOURAGED TO APPLY!
INTERESTED CANDIDATES CAN CONTACT US
9822304638
shewaletrust@gmail.com
dr.rahulshewale@gmail.com

**आकर्षक पगारावर जागा भरणे आहे**
सुपरवायझर
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)
ऑफिस असिस्टंट
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

**पाहिजेत**
तरूणांसाठी सुवर्णसंधी
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त होतकरू, तरूणांनी संपर्क साधावा
पुरुष – ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरापिस्ट
पुरूष–१/ स्त्री –१
आकर्षक पगार
9370071777
8806292948

**फ्लॅट विकणे आहे**
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड, पर्पल ब्लुम सोसायटी, साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर, 1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड, सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
ABHAY ARJUNRAO KARPE
NEW NAME AS
ABHAY ARJUN KARPE
ADD - PIMPALGOON KONJIRA TAL- SANGAMNER , DIST - A. NAGAR

**स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत**
अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स ॲंड रिफॅार्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क -
सांगळे साहेब - 9850194463 9503947084

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट - २ जागा
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा
ओ. टी. टेक्निशियन - २ जागा
डायलिसिस टेक्निशियन - २ जागा
वॉर्ड मॅनेजर - १ जागा
नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा
नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

**पाहिजेत**
रिषभ गोल्ड अॅण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)









**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे
(दोन्ही बाजूने रस्ता)
पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर
- संपर्क -
7385653323

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॅालनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

# युवावार्ता कार्यालयात उद्योजक बोऱ्हाडे व वानखेडे आरतीचे मानकरी






युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

दैनिक युवावार्ता कार्यालयामध्ये विराजमान असलेल्या गणरायाची आरती भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात प्रसिद्ध उद्योजक ड. अमोल बोऱ्हाडे व प्रसिद्ध सुवर्ण पेढी असलेल्या दंडे ज्वेलर्सचे संगमनेर शाखा व्यवस्थापक सुनील वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे व संपादक सौ. सुशीला किसन हासे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी युवावार्ताचे संचालक आनंद हासे, कार्यकारी संपादक सुदीप हासे, दंडे ज्वेलर्सचे मार्केटींग प्रतिनिधी निखील तांगडकर यांच्यासह युवावार्ता परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अमोल बोऱ्हाडे यांनी आपल्या व्यवसायाची वाटचाल सांगताना आपण रोजगार करणारे नाही तर रोजगार देणारे बनलो पाहिजे. तसेच आपल्या वयाचे आणि क्षेत्राचे बंधन न पाळता नवनवीन गोष्टी शिकले पाहिजे. मिळेल ते ज्ञान आत्मसात केले पाहिजे आणि त्याचा वापर आपल्या व्यवसायासाठी व व्यक्तीमत्वासाठी केला पाहिजे. बोऱ्हाडे यांनी अनेक विषयांत पदवी घेतली आहे आणि आणखी पदव्या मिळवण्याचे ध्येय त्यांनी ठेवले आहे. त्यांचा हा प्रवास इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे संपादक किसन भाऊ हासे यांनी सांगितले. तर दंडे ज्वेलर्सचे संगमनेर शाखा व्यवस्थापक सुनील वानखेडे यांनी दंडे ज्वेलर्स आपल्या ग्राहकांच्या हिताला, सुरक्षेला कसे प्राधान्य देते, ग्राहक हा खरा राजा असतो त्याला चांगली सेवा देण्याचे, महिलांच्या आवडीनिवडीची दखल घेतली जात असल्याने दंडे ज्वेलर्सने नाशिक, सिन्नर, संगमनेर शाखेने मोठा विश्वास निर्माण केला आहे. अल्पावधीतच संगमनेरकरांनी देखील खुप प्रेम दिल्याचे दंडे ज्वेलर्सचे वानखेडे यांनी सांगितले.

# दुष्काळ, कर्जमाफी, पीक विमा आणि जमिनीच्या हक्कांसाठी किसान सभेचे राज्यभर आंदोलन

## २१ जिल्ह्यांत शेतकऱ्यांचा एल्गार; काजू-बदामाचे पुडे देत सरकारच्या उदासीनतेचा निषेध

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने संपूर्ण नुकसानभरपाई द्यावी, नियमित कर्जदारांना किमान दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, अटी-शर्तींमुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या कर्जदारांना कर्जमुक्ती द्यावी, पीक विम्याचे काढून टाकलेले सर्व ट्रिगर पुन्हा लागू करावेत तसेच जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना जमिनीचे हक्क द्यावेत, या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने बुधवारी (दि. २३) राज्यातील २१ जिल्ह्यांत तीव्र आंदोलन करण्यात आले.



महाराष्ट्रात एल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळाची तीव्र परिस्थिती निर्माण झाली असून खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याची मागणी किसान सभेने केली आहे. यावेळी सरकारच्या दुष्काळविषयक धोरणाचा निषेध करत विविध जिल्ह्यांमध्ये आंदोलने करण्यात आली.

किसान सभेने यापूर्वी या मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर भव्य मोर्चा काढला होता. तसेच १० ऑगस्ट रोजी राज्यभर जेलभरो आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधले होते. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने किसान सभेच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची बैठक घेतली होती.

या बैठकीत नियमित कर्जदारांना दोन लाख रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तसेच अटी-शर्तींमुळे वंचित राहिलेल्या कर्जदारांना कर्जमाफी, देवस्थान, इनाम, वर्कस, गायरान व वन जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे करण्याची कार्यवाही तसेच पीक विम्याचे काढून टाकलेले ट्रिगर पुन्हा लागू करण्यासाठी तातडीने प्रक्रिया करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली होती. मात्र या चर्चेला महिना उलटून गेला तरी मान्य करण्यात आलेल्या मागण्यांच्या अंमलबजावणीबाबत ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप किसान सभेने केला आहे.

राज्यात एकीकडे दुष्काळाची गंभीर परिस्थिती असताना दुष्काळ आढावा बैठकीमध्ये मंत्री काजू-बदाम खात असल्याचा आरोप करत किसान सभेने अनोख्या पद्धतीने सरकारचा निषेध केला. राज्यभर झालेल्या आंदोलनात मंत्र्यांना निवेदनासोबत काजू-बदामाचे पुडे पाठवून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल संताप व्यक्त करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या संयमाची अधिक परीक्षा न पाहता सरकारने चर्चेत मान्य केलेल्या मागण्यांची तातडीने अंमलबजावणी करावी. तसेच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पुरेशी मदत जाहीर करावी, अन्यथा यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा किसान सभेने दिला आहे. अहिल्यानगर, ठाणे, पालघर, बुलढाणा, गडचिरोली, सांगली, पुणे, रायगड, बीड, नांदेड आदी राज्यातील २१ जिल्ह्यांत हे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनाचे नेतृत्व डॉ. अजित नवले, उमेश देशमुख, किरण गहला, अर्जुन आडे, शंकर शिडाम, सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, अजय बुरांडे, अनिल गायकवाड, उद्धव पौळ, दीपक लिपणे, रामेश्वर पौळ आदींनी केले.

# भोजापूर धरणातून डावा कालवा व पूरचारीला दुसऱ्यांदा आवर्तन



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर- तालुक्यातील भोजापूर पूरचारीवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई लक्षात घेऊन भोजापूर धरणातून डाव्या कालव्यासह पूरचारीला दुसऱ्यांदा आवर्तन सोडण्यात आले आहे. या आवर्तनामुळे पूरचारीवर अवलंबून असलेल्या गावांतील बंधारे, पाणीसाठे आणि परिसरातील शेतीला मोठा दिलासा मिळणार आहे.

संगमनेर तालुक्यातील भोजापूर पूरचारीवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये पाणीटंचाईची तीव्रता वाढली होती. अनेक बंधारे व पाणीसाठे कोरडे पडल्याने नागरिक तसेच शेतकऱ्यांसमोर पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर भोजापूर धरणातून पाणी सोडून पूरचारीवरील बंधारे भरून देण्यात यावेत, अशी मागणी भाजपच्या महिला तालुकाध्यक्ष कविता पाटील यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. अमोल खताळ यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पत्राद्वारे भोजापूर धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याने धरणातील पाणी पूरचारीला सोडण्याची मागणी केली. तालुक्यातील पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन मंत्री विखे पाटील यांनी नाशिक जलसंपदा विभागाला भोजापूर धरणातून पूरचारीला पाणी सोडण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार नाशिक जलसंपदा विभागाचे सहाय्यक अभियंता सुभाष पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली भोजापूर धरणाच्या डाव्या कालव्यातून दुसऱ्यांदा आवर्तन सोडण्यात आले आहे. त्यामुळे भोजापूर पूरचारीवर अवलंबून असलेल्या गावांतील बंधारे व पाणीसाठ्यांमध्ये पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

पाणीटंचाईच्या काळात आवर्तन सोडण्यात आल्याने संबंधित गावांतील नागरिक व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, या निर्णयाबद्दल कविता पाटील यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. अमोल खताळ तसेच जलसंपदा विभागाचे आभार मानले आहेत.

## दिनविशेष

१९७३: गिनी-बिसाऊ — देशाला पोर्तुगालपासून स्वातंत्र्य.

१९७२: जपान एअरलाइन्सचे फ्लाइट ४७३ — भारतातील मुंबई येथील सांताक्रूझ विमानतळा ऐवजी जुहू एरोड्रोमवर उतरले.

१९६०: यूएसएस एंटरप्राइझ — अणुशक्तीवर चालणाऱ्या जगातील पहिल्या विमानवाहू नौकेचे जलावतरण झाले.

१९४८: होंडा मोटार कंपनी — स्थापना.

१९४६: कॅथे पॅसिफिक एअरवेज — स्थापना.

१९३२: पुणे करार — या करारामुळे 'उदासीन वर्ग' (अस्पृश्य) लोकांसाठी भारतीय प्रांतीय कायदेमंडळांमध्ये जागा राखीव करण्यात आले.

१८७३: सत्यशोधक समाज — महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

१८५२: जिफर्ड डिरिजिबल — पहिले पॉवरयुक्त प्रवासी वाहून नेणारी एअरशिप सुरु झाले.

१८३०: बेल्जियम — देशाचे हंगामी सरकार स्थापन झाले.

## जन्म

१९४०: आरती साहा — भारतीय जलतरणपटू आणि इंग्लिश खाडी पार करणाऱ्या पहिल्या आशियाई महिला — पद्मश्री (निधन: २३ ऑगस्ट १९९४ )

१९३६: सिवंती आदिथन — शिक्षणतज्ज्ञ, उद्योगपती आणि परोपकारी — पद्मश्री (निधन: १९ एप्रिल २०१३ )

१९३६: जिम हेनसन — द मपेट्सचे जनक (निधन: १६ मे १९९० )

१९२५: अवतार सिंग पेंटल — भारतीय वैद्यकीय वैज्ञानिक, न्यूरोसायन्स व श्वसनशास्त्रात महत्त्वपूर्ण संशोधन करणारे प्रख्यात शरीरक्रियाशास्त्रज्ञ — पद्मविभूषण, रॉयल सोसायटीचे फेलो, रॉयल सोसायटी ऑफ एडिनबर्गचे फेलो (निधन: २१ डिसेंबर २००४ )

१९२४: अर्धेन्दू भूषण बर्धन — भारतीय कम्युनिस्ट नेते, स्वातंत्र्यसेनानी (निधन: २ जानेवारी २०१६ )

१९२४: गुरू चरणसिंग तोहरा — अकाली दलाचे नेते (निधन: ३१ मार्च २००४ )

१९२२: ग. वा. बेहेरे — संपादक वव साहित्यिक (निधन: ३० ऑगस्ट १९८९ )

१९२१: डॉ. स. ग. मालशे — मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक (निधन: ७ जून १९९२ )

१९२१: डॉ. सखाराम गंगाधर मालशे — लेखक, समीक्षक व संपादक (निधन: ७ जून १९९२

१८६१: मॅडम भिकाजी कामा — क्रांतिकारक (निधन: १३ ऑगस्ट १९३६ )

१७२५: आर्थर गिनीज — गिनीजचे संस्थापक, आयरिश ब्रुअर (निधन: २३ जानेवारी १८०३

१५५१: दासोपंत — संत (निधन: २८ जानेवारी १६१६ ) :

## मृत्यू

२००२: श्रीपाद जोशी — लेखक, शब्दकोशकार व अनुवादक

१९९८: वासुदेव पाळंदे — बालरंगभूमीचे खंदे पुरस्कर्ते, दिग्दर्शक

१९९२: सर्वमित्र सिकरी — १३वे सरन्यायाधीश (जन्म: २६ एप्रिल १९०८ )

१९८१: ब्रह्मारीश हुसैन शा — भारतीय तत्त्वज्ञानी आणि कवी (जन्म: ९ सप्टेंबर १९०५ )

१९५०: राजकुमारी व्हिक्टोरिया — हेसेच्या राजकुमारी (जन्म: ५ एप्रिल १८६३ )

१९३९: कार्ल लामेल्स् — युनिव्हर्सल स्टुडियोचे संस्थापक (जन्म: १७ जानेवारी १८६७ )

१८९६: लुईस गेरहार्ड डी गेर — स्वीडन देशाचे पहिले पंतप्रधान (जन्म: १८ जुलै १८१८ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२५ सप्टेंबर**

## १८७३ : सत्यशोधक समाज - महात्मा फुलेंच्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ

भारतीय समाजव्यवस्थेत जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि सामाजिक विषमता खोलवर रुजलेली असताना महात्मा ज्योतिराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. समाजातील शोषित, वंचित आणि बहुजन घटकांना सामाजिक न्याय, शिक्षण आणि समानतेचा अधिकार मिळवून देणे हा या संस्थेच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश होता. भारतीय सामाजिक सुधारणांच्या इतिहासातील ही एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते.त्या काळात जन्मावर आधारित जातिव्यवस्था समाजजीवनावर मोठा प्रभाव टाकत होती. शिक्षण, धार्मिक विधी आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या बाबतीत मोठी विषमता होती. स्त्रिया आणि तथाकथित कनिष्ठ जातींना अनेक अधिकारांपासून वंचित ठेवले जात होते. या परिस्थितीला विरोध करत महात्मा फुले यांनी 'सत्यशोधक समाजा'च्या माध्यमातून सत्य, समता आणि मानवतेवर आधारित समाजव्यवस्थेची कल्पना मांडली.सत्यशोधक समाजाचा मुख्य उद्देश बहुजन समाजाला धार्मिक आणि सामाजिक शोषणातून मुक्त करणे हा होता. समाजातील प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून समान प्रतिष्ठा मिळावी, जन्माच्या आधारावर कोणालाही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानले जाऊ नये, अशी भूमिका फुले यांनी घेतली. त्यांनी अंधश्रद्धा आणि अनावश्यक धार्मिक कर्मकांडांवर टीका केली. धर्माच्या नावाखाली होणाऱ्या शोषणाला त्यांनी वैचारिक विरोध केला.शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानून महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षण आणि वंचित घटकांच्या शिक्षणासाठी मोठे कार्य केले. सत्यशोधक समाजाच्या विचारांमध्ये शिक्षणाला विशेष महत्त्व होते. शिक्षणामुळे माणसाला आपल्या हक्कांची जाणीव होते आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद मिळते, असा फुले यांचा विश्वास होता.सत्यशोधक समाजाने विवाह आणि इतर सामाजिक विधींमध्येही साधेपणाचा आग्रह धरला. पुरोहिताशिवाय विवाह करण्याची पद्धत पुढे आणून अनावश्यक खर्च, कर्मकांड आणि मध्यस्थीला पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विवाह हा दोन व्यक्तींच्या समान संमतीवर आधारित सामाजिक करार असावा, असा विचार या चळवळीतून पुढे आला.महात्मा फुलेंच्या 'गुलामगिरी' आणि 'शेतकऱ्याचा असूड' यांसारख्या लेखनातूनही समाजातील विषमता, शोषण आणि अन्यायाविरोधातील त्यांची भूमिका स्पष्ट झाली. सत्यशोधक समाजामुळे बहुजन समाजात आत्मभान, सामाजिक हक्क आणि समानतेची जाणीव निर्माण होण्यास मोठी मदत झाली.सत्यशोधक समाज ही केवळ एक संस्था नव्हती, तर सामाजिक समतेसाठी उभी राहिलेली परिवर्तनाची चळवळ होती. पुढील काळातील सामाजिक सुधारणा, बहुजन चळवळी आणि सामाजिक न्यायाच्या विचारांवर तिचा मोठा प्रभाव पडला. आजही जातिभेद, सामाजिक विषमता आणि अंधश्रद्धेविरोधात लढताना महात्मा फुले आणि सत्यशोधक समाजाचे विचार प्रेरणादायी ठरतात.१८७३ मध्ये रोवलेले सत्यशोधक समाजाचे बीज हे भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील महत्त्वाचे पर्व ठरले. 'सत्य, समता आणि शिक्षण' या विचारांवर आधारित समाजनिर्मितीचा संदेश देणारी ही चळवळ आजही सामाजिक प्रबोधनाचा दीपस्तंभ मानली जाते.

## आरती साहा — इंग्लिश खाडी पार करणाऱ्या पहिल्या आशियाई महिला

**पुण्यतिथी विशेष**

भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचे शास्त्रज्ञ म्हणून डॉ. राजा रामण्णा यांचे नाव आदराने घेतले जाते. अणुशास्त्र, संरक्षण संशोधन आणि वैज्ञानिक प्रशासन या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले. भारताच्या अणुकार्यक्रमाला स्वावलंबी आणि सामर्थ्यशाली बनविण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांचे निधन २४ सप्टेंबर २००४ रोजी झाले.डॉ. राजा रामण्णा यांचा जन्म २८ जानेवारी १९२५ रोजी कर्नाटकातील तुमकूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना विज्ञान आणि विशेषतः भौतिकशास्त्राची आवड होती. त्यांनी उच्च शिक्षण घेतल्यानंतर अणुभौतिकशास्त्राच्या क्षेत्रात संशोधन सुरू केले. पुढे ते भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाशी जोडले गेले आणि देशातील आघाडीच्या वैज्ञानिकांमध्ये त्यांची गणना होऊ लागली.भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाचे जनक मानले जाणारे डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या नेतृत्वाखाली रामण्णा यांनी महत्त्वाचे काम केले. भाभा अणुसंशोधन केंद्राशी संबंधित संशोधनामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. अणुऊर्जा आणि अण्वस्त्र संशोधनाच्या क्षेत्रात भारताची वैज्ञानिक क्षमता वाढविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.१९७४ मध्ये पोखरण येथे भारताने केलेल्या पहिल्या अणुचाचणीत डॉ. राजा रामण्णा यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. 'स्मायलिंग बुद्धा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या अणुचाचणीने भारताच्या वैज्ञानिक आणि संरक्षण क्षमतेचा जगाला परिचय करून दिला. या प्रकल्पाशी संबंधित वैज्ञानिक नेतृत्व आणि तांत्रिक कामामध्ये रामण्णा अग्रभागी होते. त्यामुळे भारताच्या अणुकार्यक्रमाच्या इतिहासात त्यांचे नाव विशेष महत्त्वाचे ठरते.डॉ. रामण्णा यांनी केवळ संशोधन केले नाही, तर वैज्ञानिक संस्थांचे नेतृत्वही प्रभावीपणे केले. त्यांनी भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक म्हणून काम केले. त्यानंतर भारताच्या अणुऊर्जा



आयोगाच्या चौथ्या अध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली. या काळात भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाला संस्थात्मक आणि तांत्रिक बळकटी देण्याचे काम त्यांनी केले.त्यांच्या कार्याचा विस्तार संरक्षण संशोधन क्षेत्रातही झाला. त्यांनी संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेत (DRDO) महत्त्वाची जबाबदारी सांभाळली. भारताच्या संरक्षण तंत्रज्ञानातील स्वावलंबनासाठी त्यांनी प्रयत्न केले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग राष्ट्रीय सुरक्षेसाठी करण्याच्या दृष्टीने त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले.रामण्णा हे केवळ प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ नव्हते. त्यांना संगीताचीही विशेष आवड होती. ते उत्तम पियानोवादक होते आणि पाश्चात्त्य शास्त्रीय संगीताचा त्यांना गाढा अभ्यास होता. विज्ञानासोबत संगीताची सांगड घालणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत बहुआयामी होते.देशाच्या विज्ञान क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना अनेक सन्मान मिळाले. भारत सरकारने त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या प्रतिष्ठित नागरी पुरस्कारांनी गौरविले.२४ सप्टेंबर २००४ रोजी डॉ. राजा रामण्णा यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारताने एक प्रतिभावान अणुशास्त्रज्ञ, वैज्ञानिक प्रशासक आणि राष्ट्राच्या संरक्षण-विज्ञान क्षेत्राला दिशा देणारे व्यक्तिमत्त्व गमावले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी प्रशासन सज्ज !

## मिरवणुकीवर सीसीटीव्हीची नजर; डीजेला बंदी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या भक्तिमय सोहळ्यानंतर उद्या (शुक्रवारी) अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाला निरोप देण्यासाठी संगमनेरसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा सज्ज झाला आहे. गणेश विसर्जन मिरवणुका शांततेत, शिस्तीत आणि उत्साहात पार पडाव्यात यासाठी नगरपालिका प्रशासन आणि पोलीस यंत्रणेने जय्यत तयारी पूर्ण केली आहे. जिल्ह्यातील तब्बल ३ हजार ३१२ लहान-मोठ्या सार्वजनिक व खासगी गणेश मंडळांच्या मूर्तींचे विसर्जन होणार असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

संगमनेर शहरातील विसर्जन मिरवणुकीला पहिला मानाचा गणपती असलेल्या ग्रामदैवत सोमेश्वर गणपतीच्या उत्थापन पूजेनंतर सकाळी ९ वाजता सुरुवात होणार आहे. तालुक्यातील लोकप्रतिनिधी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पूजा होणार असून, त्यानंतर मानाच्या गणपतीची मिरवणूक मार्गस्थ होईल.

विसर्जन मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रमुख मिरवणूक मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. याशिवाय मिरवणूक मार्गावरील दुकाने व विविध आस्थापनांमध्ये असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचीही पोलिसांकडून मदत घेतली जाणार आहे. संवेदनशील ठिकाणी फिक्स पॉइंटवर पोलीस कर्मचारी तैनात करण्यात येणार असून, मिरवणुकीतील प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे.

जिल्ह्यात यंदा २५५ गावांमध्ये 'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेतून गणेशाची स्थापना करण्यात आली आहे. संगमनेर शहरासह, नगर, श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव, कोपरगाव, जामखेड यांसह विविध शहरांमध्ये तसेच ग्रामीण भागात उद्या विसर्जन मिरवणुका निघणार आहेत. संबंधित पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे.

विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम १६३ अन्वये ६२३ गुन्हेगारांना विसर्जन मिरवणुकीच्या काळात हद्दपार करण्यात आले आहे. यामध्ये संगमनेर शहरासह जिल्ह्यातील विविध भागांतील गुन्हेगारांचा समावेश आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये २ अपर पोलीस अधीक्षक, १० पोलीस उपअधीक्षक, २५ पोलीस निरीक्षक, २०० सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक आणि सुमारे २,२०० पोलीस कर्मचारी सहभागी असतील.

याशिवाय होमगार्ड, एसआरपीएफची एक तुकडी, क्यूआरटीच्या दोन तुकड्या, १० स्ट्रायकिंग फोर्स, साध्या वेशातील पोलिसांची पथके, छेडछाडविरोधी पथक तसेच ध्वनी प्रदूषणाची पातळी तपासण्यासाठी स्वतंत्र पथक तैनात करण्यात येणार आहे. संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याने विसर्जन मिरवणुकीदरम्यान पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

### गंगामाई घाटावर विशेष व्यवस्था

**विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेने मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजविले असून, काही ठिकाणचे अतिक्रमणही हटविण्यात आले आहे. शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी गणेशमूर्ती संकलन केंद्रे उभारण्यात आली आहेत. घरगुती गणपतींच्या विसर्जनासाठी तात्पुरते हौद तयार करण्यात आले असून, गंगामाई घाटावरही विशेष विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जनस्थळी वीज व्यवस्था, सुरक्षा रक्षक तसेच आवश्यक मनुष्यबळ तैनात करण्यात येणार आहे. नगरपालिकेला सहकार्य करण्यासाठी एकविरा फाउंडेशन, बजरंग दल, लायन्स क्लब, रोटरी क्लब, विश्व हिंदू परिषद यांसह विविध सामाजिक, स्वयंसेवी आणि राजकीय संस्थांचे कार्यकर्तेही मैदानात उतरणार आहेत.**

### पारंपरिक वाद्यांना प्राधान्य

**विसर्जन मिरवणुकीत ध्वनी प्रदूषण होणार नाही, यासाठी पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. मोठ्या आवाजातील डीजे, प्लाझ्मा-लेझरचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले असून, पारंपरिक वाद्यांचा वापर करण्याचे आवाहन पोलिसांनी गणेश मंडळांना केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.**

## 'वर्षा' निवासस्थानी आ. तांबे यांचे सपत्नीक गणराय दर्शन



मुंबई (वृत्तसंस्था) विधान परिषद आमदार सत्यजीत तांबे यांनी पत्नी तथा संगमनेर नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे आज दर्शन घेतले.

यावेळी गणरायाची मनोभावे पूजा-अर्चा करून महाराष्ट्रात बळीराजावर असलेले दुष्काळाचे संकट दूर व्हावे अशी गणरायाच्या चरणी प्रार्थना केली. गणपती बाप्पाच्या दर्शनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही सदिच्छा भेट घेतली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने झालेल्या या भेटीत विविध विषयांवरही अनौपचारिक चर्चा झाली.

## पान १ वरून संगमनेर-कौठे ...

शिर्डी, शनिशिंगणापूर यासह जिल्ह्यातील विविध आध्यात्मिक स्थळांना जोडणारा हा मार्ग भाविकांसाठीही सोयीचा ठरणार आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर भविष्यात मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे रस्त्याचे काम दर्जेदार आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्याची सूचना विखे पाटील यांनी केली.

औद्योगिक विकास, धार्मिक पर्यटन आणि दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या महामार्गाच्या कामाला सुरुवात झाल्याने संगमनेर तालुक्यासह परिसरातील नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

# दोन महिन्यांनंतर पावसाच्या सरी बरसल्या, शेतकऱ्यांची तहान मात्र कायम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गेल्या दोन महिन्यांपासून दडी मारलेल्या पावसाने अखेर बुधवारी (दि. २३) सायंकाळी साडेचारच्या सुमारास संगमनेर शहरासह तालुक्यातील काही भागांत हजेरी लावली. त्यामुळे दीर्घ प्रतीक्षेनंतर शेतकऱ्यांना पावसाच्या सरी पाहायला मिळाल्या. मात्र काही वेळ बरसून पाऊस पुन्हा गायब झाल्याने जोरदार पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांचा हिरमोड झाला.

संगमनेर तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने सध्या दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामातील पिके पाण्याअभावी करपू लागली असून, पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पावसाचा थेंबही समाधानकारकपणे न पडल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात पावसाचे आगमन होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता. मात्र गणरायाच्या आगमनाला नऊ दिवस उलटत आले तरी पावसाने पाठ फिरवली होती. त्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. अशातच बुधवारी सायंकाळी शहरासह तालुक्यातील काही भागांत पावसाच्या सरी कोसळल्या. त्यामुळे काही काळासाठी वातावरणात गारवा निर्माण झाला आणि शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या.

मात्र जोरदार पाऊस होईल, अशी अपेक्षा असतानाच काही वेळात पावसाने उघडीप दिली. त्यामुळे जमिनीला अपेक्षित ओलावा मिळू शकला नाही. परिणामी, 'पाऊस आला खरा; पण पिकांना जीवदान देईल एवढा नाही', अशी शेतकऱ्यांची अवस्था झाली आहे.

येत्या काही दिवसांत दमदार पाऊस होईल, अशी आशा शेतकरी व्यक्त करीत आहेत. मात्र तोपर्यंत शेतातील पिके कशी जगवायची, हा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे. तालुक्यातील काही गावांना सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याने पाणीटंचाईची तीव्रता देखील कायम आहे.

बुधवारी झालेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा जाग्या केल्या असल्या तरी पिकांना संजीवनी देण्यासाठी मोठ्या पावसाची गरज आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत वरुणराजा दमदार हजेरी लावतो का, याकडे संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
※ कर्ज रक्कम वाढ । ※ कर्ज व्याजदर कमी । ※ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल

24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25